नि. फौ. ख. क्र. ३४६/२०२३ निशाणी ९

**सरकार तर्फे साक्षीदार क्र. १ यांचा जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – इंदुबाई बळीराम टिकार

वय – ६६ वर्षे, व्यवसाय – घरकाम

पत्ता – कासारखेड, बाळापूर, ता. बाळापूर, जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती एस. व्ही. इंगळे यांचेमार्फत सरतपास सुरुः**

१. दि. २५.०४.२०२३ रोजी मी माझी नात आनंदी सोबत अकोला येथे जात होते. अकोला येथे जाण्यासाठी मी बाळापुर बस स्टॅन्डवर गेले. तेथे गेल्यावर शेगाव अकोला बस आली. गाडीत गर्दी होती आम्ही बस मध्ये चढण्यासाठी रांगेत उभे राहिलो. आम्ही बस मध्ये चढत असतांना मला जाणवले की, माझ्या मानेला झटका लागला. मी मागे वळुन माझी पोत पाहिली असता माझी पोत दिसली नाही. मी चढत असतांना माझ्या पुढे व मागे महिला होत्या. मला माझी पोत चोरी झाल्याचे लक्षात आल्यावर मी वाहकाला गाडी थांबविण्यास सांगितले. आम्ही गाडी पोलीस स्टेशनला घ्यायला लावली. माझी पोत अंदाजे २० ग्रॅम किंमत रु. १,२०,०००/– होती. पोलीसांनी गाडीचा तपास केला. मी पोलीसांना सांगितले की, माझ्या मागे एक पांढऱ्या रंगाचा रुमाल बांधलेली एक महिला चढत होती. पोलीसांनी बस मधील प्रवाशांची झडती घेतली. झडती घेतल्यावर एका महिलेच्या पर्समध्ये माझी पोत आढळुन आली. त्या महिलेने गुलाबी रंगाची साडी आणि पिवळ्या रंगाचे ब्लाउज घातले होते. त्या महिलेसोबत इतर दोन महिला होत्या. मला तिन्ही महिलांची नावे आठवत नाही. मी घाबरली असल्यामुळे त्यांची नावे मला आठवत नाही. घटनेला बराच कालावधी झाल्याने मला त्यांची नावे आठवत नाही. झडतीत माझी पोत मिळाल्यानंतर मी ती ओळखली. त्यानंतर मी त्या तिन्ही महिलांविरुध्द रिपोर्ट दिला. मला रिपोर्ट दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. १०** देण्यात येते. मला छापील प्रथम खबर दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ११** देण्यात येते.

२.		मला त्या तिन्ही महिलांची नावे आठवन करुन दिल्यास आठवेल. त्यांची नावे गुलाबी रंगाची साडी व पिवळे ब्लाउज घातलेल्या महिलेचे नाव शितल खडसे, विद्या खंडारे आणि संध्या राखडे सर्व रा. अशोक नगर, वर्धा अशी होती. मला माझी पोत न्यायालयाच्या आदेशाने सुपुर्तनाम्यावर परत मिळाली आहे. सुपुर्तनाम्याला **नि.क्र. १२** देण्यात येते. ज्यावेळी महिलांनी माझी पोत ओढली त्यावेळी त्या महिला मला बस मध्ये लोटत होत्या. आजरोजी सदर तिन्ही महिला न्यायालयात हजर नाही. त्यांना पाहिल्यास मी ओळखु शकते.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.बी.पी.उपर्वट यांच्या मार्फत –</u>**

३.		बाळापुर बस स्टॅन्डवर ऑटो उभ्या राहतात व त्याठिकाणी नेहमी वर्दळ असते. मला लिहिता वाचता येते. मी ज्या बस मध्ये चढत होती त्या बसचा नंबर मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला रिपोर्ट मधील मजकुर वाचुन दाखविला नाही. मी ज्या बस मध्ये चढणार होती त्या बस मध्ये प्रचंड गर्दी होती. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझी पोत कोणाकडुन जप्त केली मला माहित नाही. साक्षीदार पुन्हा सांगतात की, पोत कोणाकडुन जप्त केली मला माहित आहे. हे म्हणणे खरे नाही की, ज्या महिलेकडुन पोत जप्त केली त्या महिलेचा चेहरा मी प्रत्यक्ष पाहिला नाही. घटनेच्या वेळी मला महिलांची नावे माहिती नव्हती. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, नंतरहुन मला माहित झाले.

४.		मी बस स्टॅन्डवर जाण्यासाठी सकाळी ०९.३० वाजता ऑटोने निघाली. माझ्या घरापासुन बाळापूर बस स्टॅन्ड येथे ऑटोने जाण्यासाठी ५ मिनिट लागतात. मी बस स्टॅन्डवर गेली त्यावेळी बस स्टॅन्डवर ४–५ बस थांबलेल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, माझी गळयातील पोत वायरच्या धाग्यात गुंफलेली होती. साक्षीदार स्वतःहून सांगतात की, माझी पोत गोफची होती. मी जेव्हा बस मध्ये चढत होती त्यावेळी माझ्या पाठीमागे ९–१० महिला होत्या. माझ्या पाठीमागे ९–१० महिलांपैकी ३–४ महिलांनी गुलाबी रंगाची साडी, पिवळया रंगाचे ब्लाउज आणि पांढऱ्या रंगाचा रुमाल परिधान केलेला होता. माझ्या गळयातील पोत निश्चित कोणत्या महिलेने ओढली त्या महिलेचा

चेहरा मी पाहिला नाही. पोलीसांनी रिपोर्ट लिहिला आणि मला सही करण्यास सांगितले म्हणुन मी त्या रिपोर्टवर सही केली. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी रिपोर्ट त्यांच्या मनाने लिहिला व मला सही करण्यास सांगितले.

५. हे म्हणणे खरे नाही की, माझे सरतपासातील संपुर्ण मजकूर मी खोटा सांगितलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी घटनेबाबत माझ्याकडे चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA
Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2024.10.11 12:13:12 +0530

बाळापूर.
दि.०९/१०/२०२४

(श्रीमती डी. एम. पाटील)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर